दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक




vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२६ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ९६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 26 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 96 | Pages 4 | Rate 4 Rs

# संविधान सन्मान महासभेतून ॲड.प्रकाश आंबेडकरांचा भाजप-आरएसएसवर जोरदार प्रहार

## शिवाजी पार्कवर लाखोंचा सविधांन महासागर



**मुंबईच्या ऐतिहासिक शिवाजी पार्क मैदानावर आयोजित संविधान सन्मान महासभा दि. २५ नोव्हेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित केली होती. या सभेला लाखोंच्या संख्येने जनसागर उसळला. देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखों संविधानप्रेमींनी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचे विचार ऐकण्यासाठी हजेरी लावली. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अत्यंत थेट, स्पष्ट आणि टोकदार भाषेत केंद्र सरकारच्या धोरणांवर, संघ परिवाराच्या भूमिकेवर आणि देशातील वाढत्या धार्मिक ध्रुवीकरणावर तीव्र टीका केली.आंबेडकर म्हणाले की, पंतप्रधान मोदी जगभर दौरे करत असले तरी भारतासाठी कोणताही देश पुढे येत नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतावरील विश्वास कमी होत चालला आहे, कारण जगाला भारत आज धार्मिक विभाजनाच्या दिशेने जाताना दिसत आहे. लोकशाहीला मागे ढकलून हुकूमशाहीचा मार्ग स्वीकारला, तर जग आपल्यावर कधीच विश्वास ठेवणार नाही.याच संदर्भात त्यांनी आरएसएसच्या आंतरराष्ट्रीय वैचारिक कनेक्शन्सचा उल्लेख करत मोहन भागवतांना थेट प्रश्न विचारला. १९३० च्या दशकात आरएसएसचे कार्यकर्ते हिटलर आणि मुसोलिनी यांच्या भेटीस गेले होते, असे ऐतिहासिक पुरावे सांगतात. मग तुम्ही सांगा, हिटलरला आदर्श मानता का? मुसोलिनीचा मार्ग मान्य करता का? अशा कठोर पण वस्तुनिष्ठ प्रश्न विचारत आंबेडकरांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



प्रकाश आंबेडकर यांनी पाकिस्तानचे उदाहरण देत सांगितले की, धर्माधारित राष्ट्र किती अस्थिर असते. पाकिस्तानला धर्माच्या आधारावर स्वातंत्र्य मिळाले, पण केवळ २४ वर्षांत त्यांची फूट होऊन बांगलादेश निर्माण झाला. कारण धर्म राष्ट्राला एकत्र ठेवू शकत नाही. राष्ट्राला एकत्र ठेवतात ते समता, स्वातंत्र्य आणि बंधुता. ही मूलतत्त्वे हीच भारताची खरी ओळख आहे.

मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणातील चुकांमुळे भारत एकाकी पडत आहे. उद्या युद्ध परिस्थिती आली आणि अमेरिका, रशिया किंवा चीन यांनी शत्रुराष्ट्राला शस्त्रपुरवठा केला तर आपण काय करणार? आपण जगाशी मैत्री तोडून फक्त नुसत्या भाषणांनी युद्ध जिंकणार आहोत का? असा रोखठोक प्रश्न त्यांनी विचारला. सनातनवाद्यांना उद्देशून त्यांनी सांगितले की देशाची सुरक्षा घोषणांनी नाही, तर तर्कशुद्ध आणि सर्वसमावेशक धोरणांनी होते.राजकीय स्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले की, भाजप आता देशात एकपक्षीय व्यवस्था निर्माण करत आहे. प्रादेशिक पक्ष संपवून लोकशाहीचे वैविध्य नष्ट केले जात आहे. जे संविधानवादी आहेत तेच राष्ट्रवादी. जे मनुवादी आहेत ते देशाचे विघटन करणारे, असे म्हणत त्यांनी धार्मिक ध्रुवीकरण करणाऱ्यांवर जोरदार प्रहार केला.आपण ठरवले पाहिजे की इगझ-ठडड ला मत देणार नाही. कारण जे तुमचे हक्क हिरावून घेत आहेत त्यांनाच तुम्ही सत्ता देणार का? तुमचे एक मत म्हणजे तुमचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्याची ताकद आहे, असे आंबेडकरांनी म्हटले.संघटनेच्या नोंदणीच्या प्रश्नावर त्यांनी मोहन भागवतांना थेट आव्हान दिले. देशातील प्रत्येक संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे, मग ठडड ची नोंदणी का नाही? औरंगाबाद कोर्टात तुमच्यावर केस आहे. नोंदणी नसलेल्या संघटनेला सरकारी सुरक्षा का दिली जाते? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.सभा स्थळी उसळलेली जनसमुदायाची उपस्थिती पाहून ते म्हणाले की हीच उपस्थिती मतपेटीत उतरली, तर लोकशाहीची दिशा बदलू शकते. राजा मतपेटीतून ठरतो. त्यामुळे या पुढच्या निवडणुकांमध्ये आपली ताकद दाखवा, असा त्यांनी जनतेला दिलेला संदेश सभेचा मुख्य गाभा ठरला.या संविधान सन्मान महासभेला विविध क्षेत्रातील मान्यवरांची भव्य उपस्थिती लाभली. बंगलोर येथील जगद्गुरू चन्नबसवानंद महास्वामी, शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मातोश्री विजयाबाई सूर्यवंशी, बुलढाण्यातील भन्ते राजज्योती, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे सदस्य मौलाना डॉ. अब्दुर रशीद मदणी आणि पंढरपूर येथील ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर बंडगर महाराज हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर, युवा नेते सुजात आंबेडकर, वंचित बहुजन आघाडीच्या केंद्रीय कार्यकारिणीतील अशोक भाऊ सोनोने, दिशा शेख, अरुंधती शिरसाट, ॲड. प्रियदर्शी तेलंग, महेश भारतीय, डॉ. अरुण सावंत आणि प्रा. किसन चव्हाण यांची उपस्थिती होती. राज्य स्तरावर रेखाताई ठाकूर, डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, फारुख अहमद, डॉ. अनिल जाधव, सर्वजित बनसोडे, सिद्धार्थ मोकळे, अमित भुईगल, राजेंद्र पातोडे आणि अविनाश भोसीकर यांनी हजेरी लावली. राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते, तय्यब जफर तसेच मुंबई प्रदेशाध्यक्ष चेतन अहिरे, मुंबई महिला आघाडी अध्यक्षा स्नेहल सोहनी आणि मुंबई युवा आघाडी अध्यक्ष सागर गवई यांच्या उपस्थितीने सभा अधिक भव्य आणि प्रभावी झाली.

# खा.बजरंग सोनवणे यांच्या प्रचार दौऱ्याने परळीतील वातावरण ढवळून निघाले

## परळी न.प.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार)गटाच्या विचारांची आणण्यासाठी खासदार ठाण मांडून!

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**



परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ खा. बजरंग सोनवणे यांनी शहरातील प्रत्येक प्रभागाचा दौरा करून आढावा घेतला . नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.संध्या दीपक देशमुख यांचा व नगर परिषद निवडणुकीतील सर्व उमेदवार निवडून आल्याचे चित्र दिसत होते. विजय निश्चित असल्याचे खा.बजरंग सोनवणे यांना काल मिळालेल्या प्रतिसादातून दिसले. त्यांच्या प्रचारात पक्षाचे खासदार उतरले आहेत. शहरातील प्रभाग क्रमांक ८, १, १४, १७ आणि ९ येथे प्रचार दौरा केला, या दौऱ्यात प्रभाग क्रमांक आठ मधील लक्ष्मीबाई कस्बे, कच्छी माज रफीक उमेदवार यांच्या प्रचारार्थ सकाळी १० वाजता प्रभाग ८ मध्ये दुपारी १ वाजता प्रभाग क्र. १४ व १७ उमेदवार पल्लवी समीर कोरे, वैजनाथ कळसकर , १७ मधील उमेदवार शेख सुरय्या सद्दाम हुसेन आणि शेख निसार नासिर यांच्या प्रचार्थ फेरी काढली. सायंकाळी ४ वाजता प्रभाग १ मधील उमेदवार शेख नबी हबीब व शेख नादानबी खाजा आणि ९ मधील संपत होणाजी हजारे व सलीमा आबेद खान या उमेदवारांच्या प्रचारार्थ फेरी काढली. या सर्व प्रभागामध्ये मतदार व नागरिकांचा अभुतपुर्व प्रतिसाद मिळाला.या प्रतिसादातून , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचा विजय असल्याचे दिसून आले. खा.बजरंग सोनवणे यांचे परळी नगर परिषदेवर विशेष लक्ष असून ठाण मांडून बसले आहेत. त्यामुळे वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. दरम्यान, मा. खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासमवेत मा. राजेभाऊ फड, प्रदेश सरचिटणीस,मा. दीपक नाना देशमुख , तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, शहराध्यक्ष जीवनराव देशमुख, उत्तम, मुन्ना काळे, माने,मुक्ताराम गवळी, गणेश देवकते, अक्षय सोनवणे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व मित्र पक्ष आघाडी सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिनविरोध निवडीचा ट्रेंड लोकशाही साठी घातक-खासदार सुप्रिया सुळे

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकशाही टिकवण्यासाठी बिनविरोध निवडून देण्याचा नवीन ट्रेंड थांबायला हवा, असे स्पष्ट मत व्यक्त केले. निवडणूक आयोगाबद्दल अविश्वास निर्माण होणे ही अत्यंत घातक बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले.एका वृत्तपत्राने या मुद्द्यावर विचार मांडला असून, त्यावर गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. लोकशाहीवर विश्वास असेल आणि ती जिवंत राहावी अशी इच्छा असेल, तर बिनविरोध निवडीचा हा नवीन ट्रेंड थांबवणे गरजेचे आहे, असे सुळे म्हणाल्या. आपल्या अनेक पिढ्यांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला, त्यामुळे आज त्या स्वातंत्र्यावर गदा येते आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो, असेही त्यांनी सांगितले.

अनिल देशमुख यांच्या कुटुंबातील वादाच्या बातम्यांवरही सुप्रिया सुळे यांनी भाष्य केले. त्या म्हणाल्या की, काही लोक नेहमीच आमच्या विरोधात बोलत असतात. अनिल देशमुख असोत किंवा इतर कोणी, त्यांच्या घरात काय घडले यावर चर्चा करण्याचा आम्हाला अधिकार नाही. अनिल देशमुख यांनी चार-पाच दशके जनतेची सेवा केली आहे. देशमुख कुटुंबात काही वाद आहेत, ही बातमी त्यांना खोटी आणि तथ्यहीन वाटते.राजकारणात आपण सेवेसाठी आलो आहोत. सलिल देशमुख यांच्या मनात 'पहिले देश, मग पक्ष आणि नंतर घर' हेच समीकरण आहे. त्यामुळे सूत्रांच्या आधारे येणाऱ्या बातम्यांना काही आधार नाही, असे सुळे यांनी स्पष्ट केले. सलिल देशमुख यांच्या दुसऱ्या पक्षात जाण्याचा प्रश्नच येत नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

# नंदुरबार तीन वर्षांच्या बालिकेवर अश्लील चाळे

## १५ वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालक २४ तासांत जेरबंद,रिमांड होममध्ये रवानगी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

गंगापूर गावात एका तीन वर्षीय अल्पवयीन बालिकेसोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी नंदुरबार पोलिसांनी तत्परता दाखवत एका १५ वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालकाला २४ तासांच्या आत ताब्यात घेतले आहे. बाल न्याय मंडळासमोर हजर केल्यानंतर त्याची रवानगी रिमांड होममध्ये करण्यात आली आहे. दिनांक २३ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ०५. ३० वाजेच्या सुमारास गंगापूर गावात राहणाऱ्या एका १५ वर्षीय मुलाने गावातील एका ३ वर्षीय अल्पवयीन बालिकेस कुरकुरेचा पुडा दाखवून बोलावले. त्यानंतर त्याने तिला कडेवर बसवून गावातीलच एका अर्धवट बांधकाम झालेल्या घरात नेले आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले. त्यानंतर तो घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहितेचे कलम ७६ सह पोक्सो कायद्याचे कलम ८, १०, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी लागलीच समांतर तपास सुरू केला. अवघ्या २४ तासांचे आत तपास पथकाने संशयित आरोपीचा शोध घेतला असता तो १५ वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालक असल्याचे समजून आले आणि त्याला ताब्यात घेण्यात आले.तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश भदाणे यांनी बालकाला बाल न्याय मंडळासमोर हजर केले. न्यायालयाने त्याची दिनांक १६ डिसेंबर २०२५ पर्यंत रिमांड होममध्ये रवानगी केली आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही महत्त्वपूर्ण कारवाई यशस्वी करण्यात आली.



संपादकीय

# श्रमेव जयते



पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी संसदेत श्रम संहितेला मंजुरी देऊन भारतातील ४० कोटी कामगारांना त्यांच्या श्रमांचा लाभ मिळवून दिला आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या सुधारणा स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या आणि परिवर्तनकारी असल्याचे सांगण्यात येत आहेत. या नव्या सुधारणा वसाहतवादी काळातील म्हणजे कालबाह्य आणि निरूपयोगी झालेल्या ब्रिटिश राजवटीतील कामगार कायद्यांची जागा घेतील. भारताला विकसित देश बनवण्याच्या दृष्टीने या नव्या सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ट्रेड युनियन्स आणि डाव्या प्रणित पक्षाच्या कामगार संघटना सोडल्या, तर बहुतेक सर्वांनी या सुधारणांचे स्वागत केले आहे. कारण या सुधारणेमुळे आर्थिक लाभाबरोबरच कामागारांना सुरक्षाही देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे लिंगभेद पूर्णपणे संपुष्टात आला आहे. लिंगभेद आता संपुष्टात आल्याचे जाहीर होत असून, देशभरातील लाखो महिलांच्या दृष्टीने या सुधारणा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. एमएसएमई म्हणजे लघू, सूक्ष्म व मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. देशातील जवळपास एक पंचमांश एमएसएमई उद्योगांचे नेतृत्व महिलांकडे आहे. या महिला उद्योजकांना अधिक सामर्थ्य व संधी देण्यासाठी या सुधारणा 'नारीशक्ती'चा खरा सन्मान करतात.या कोडमुळे महिला कामगारांची उत्पादकता वाढेल, कार्यक्षेत्रात त्यांना अधिक संधी मिळेल आणि सामाजिक न्यायाची भक्कम पायाभरणी होईल. हे या सुधारणांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. आतापर्यंत ही नियमावली अनेक क्षेत्रांत पाळली जात नसे; मात्र आता असा भेदभाव चालणार नाही. महिलांना समोर ठेवून हे कोड तयार करण्यात आले असले तरीही सर्व कामगारांना आणि देशातील कामगारशक्तीचा विचार करण्यात आला आहे. नव नियुक्तांना नियुक्तीपत्रे देण्याची तरतूद, महिलांसाठी कामाचे तास निश्चित करणे आणि वेतन वेळेवर देणे, कामावर अपघात झाला, तर त्याची पूर्ण भरपाई देणे आणि कामगार वर्गाची प्रतिष्ठा वाढवणे हा लेबर कोडचा उद्देश आहे. हे नवीन लेबर कोड का आणावे लागले मागे एक विचार आहे. तो म्हणजे जे लेबर म्हणजे कामगारविषयक कायदे होते ते सर्व कालबाह्य झाले आहेत आणि ते ब्रिटिश काळातील होते. त्यामुळे त्यामध्ये व्यापक सुधारणा करणे काळाची गरज बनली होती. या नव्या कोडचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांना आता रात्रपाळीत काम करण्याची तसेच धोकादायक व जड यंत्रसामग्री हाताळणाऱ्या क्षेत्रात, जसे की खाणकाम, अशा ठिकाणी काम करण्याची औपचारिक परवानगी देण्यात आली आहे. मात्र, यासाठी संबंधित महिलांची स्पष्ट संमती आवश्यक असेल आणि त्यांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना बंधनकारक असतील. यामुळे लिंगाधिष्ठित भेदभाव दूर करण्याचा ठोस प्रयत्न केला गेला आहे. तसेच तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. या कोडद्वारे प्रत्येक कामगाराला सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याशिवाय, सर्व कामगारांसाठी ईएसआयसीचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत. एकच कामगार जरी धोकादायक कामात गुंतलेला असेल, तरीही त्याला ईएसआयसीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे.या कोडचे सर्वात वैशिष्ट्य म्हणजे जिग कामगार म्हणजे स्विगी किंवा ओला, उबेर यासारख्या कामगारांनाही इएसआयसीचाचा लाभ मिळेल. त्यांना यापूर्वी असे लाभ दिले जात नव्हते. वेतन संहिता,औद्योगिक संबंध संहिता आणि सामाजिक सुरक्षा संहिता या सर्वांना एकत्रित करून हा लेबर कोड तयार करण्यात आला आहे. सरकारने या कोडद्वारे 'इज ऑफ डुइंग बिझीनेस'ला चालना दिली असली तरीही काँग्रेसने नेहमीच्या सवयीप्रमाणे सरकारच्या प्रत्येक निर्णयावर टीका करण्याच्च्या प्रथेला जागून याही निर्णयावर टीका केली आहे. हे कायदे कामगारांच्या मागण्या लक्षात न घेता लागू केले असून राष्ट्रीय किमान वेतन, नागरी रोजगार हमी आणि सार्वत्रिक आरोग्य कवचाचा लाभ यापासून कायदे वंचित आहेत, असे काँग्रेसने म्हटले आहे. काँग्रेसने हे कायदे म्हणजे भांडवलशाहीला पोषक असून त्यामुळे त्यांना हवे तेव्हा कुणालाही काढता येणार आहे असे म्हटले आहे. अर्थात हे खरे आहे की, ले ऑफची तरतूद १०० वरून ३०० करण्यात आली आहे आणि यामुळे पूर्वी जी शंभर कामगार असलेल्या कंपन्या बंद करण्याची परवानगी सरकारकडून घ्यावी लागत असे त्याला आता ३०० कामगार असणे गरजेचे आहे. काँग्रेसने अशी टीका केली आहे की, या कोडमध्ये हायर अॅण्ड फायर राजवटीला चालना मिळेल, पण काँग्रेसने यापेक्षाही कामगारविरोधी कायदे आणले होते. त्यामुळे आता या कोडविरोधात तक्रारीचा सूर लावणे म्हणजे केवळ भाजपविरोधात काही करता येणे शक्य नाही म्हणून गळे काढणे आहे.काँग्रेस आणि ट्रेड युनियन्स यांचा या नव्या कोडला विरोध आहे. कारण दोन्ही सत्तेतून बाहेर आहेत आणि ट्रेड युनियन्स, तर डाव्यांच्या आहेत. काँग्रेस सरकार डाव्यांच्या ओंजळीतून पाणी पित होते, तेव्हा डाव्यांची मनमानी चालत होती. पण आता मोदी सरकारने डाव्यांचे अस्तित्व संपवले आहे आणि त्यामुळे डाव्यांची पोटदुखी सुरू आहे. नवी संहिता ही लोकशाहीविरोधी आहे असे डाव्या संघटनांनी म्हणणे म्हणजे विनोद आहे, कारण डाव्यांची लोकशाही पालन करण्याची ख्याती नाही. अर्थात सर्वच कामगार कांग्रेसच्या विचारांवर चालणारे नाहीत. त्यांनी या नव्या सुधारणांना पाठिंबा दर्शवला आहे आणि मोदी सरकारची प्रशंसा केली आहे. यात सर्वात महत्वाचे म्हणजे अर्थतज्ज्ञांनी मोदी सरकारची संहिता अल्पकालीन आव्हानांना सामोरी जाणारी आहे पण दीर्घकालीन आर्थिक गेन म्हणजे देणारी आहे असे मत व्यक्त केले आहे. या कोडमुळे आर्थिक वाढीला चालना मिळणार असून रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होणार आहे. हा एक मोठा फायदा आहे. तसेच रोजगार निर्मितीही अत्यंत स्पर्धात्मक वातावरण आणि स्वयंपूर्ण राष्ट्रात होणार आहे अशी भावना व्यक्त केली आहे. या कोडमुळे 'इज ऑफ डुइंग बिझीनेस' तयार होणार आहे आणि हेच मोदी सरकारचे अंतिम उद्दिष्ट आहे.

## 'प्रत्येक हातात पुस्तक, प्रत्येक चेहऱ्यावर हास्य!'

# अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचा नंदुरबार मधील दुर्गम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम

### माजी जिल्हा परिषद सदस्य किरसिंग वसावे यांच्या उपस्थितीत लिंबिपाडा (अरेठी) येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनने समाजसेवेच्या उदात्त भावनेतून नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत स्तुत्य आणि लोकोपयोगी उपक्रम राबविला. अक्कलकुवा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा लिंबिपाडा (अरेठी) येथील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या शाळेत शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बळ कुटुंबातून येतात. त्यांच्या शिक्षणात कोणताही खंड पडू नये आणि त्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे या उदात्त हेतूने फाउंडेशनने पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, पेन, पेन्सिल, रबर, पट्टी यांसारखे महत्त्वाचे शालेय साहित्य वितरित करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद झळकला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य किरसिंग वसावे हे होते. तर कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सोनू वसावे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख प्रतापसिंग तडवी, ग्रामपंचायत सदस्य उदेसिंग वसावे, अमरसिंग वसावे, आणि जात्र्या वसावे हे उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात किरसिंग वसावे यांनी अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचे विशेष आभार मानले. ते म्हणाले, अशा प्रकारच्या सामाजिक संस्थांच्या सहकार्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उत्साह वाढीस लागतो.

याचबरोबर, फाउंडेशनने राबविलेला हा उपक्रम इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस तो उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. किरसिंग वसावे यांनी सातपुड्यातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनसारख्या सामाजिक संस्थांनी पुढे येऊन पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

यावेळी केंद्रप्रमुख प्रतापसिंग तडवी, शिक्षक दिनकर दावभट, उदेसिंग वसावे आणि जात्र्या वसावे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचे अध्यक्ष ओमकार देशमुख यांनी माहिती दिली की, यापूर्वीदेखील संस्थेने विविध ठिकाणी शिक्षण, आरोग्य व समाजकल्याण क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम यशस्वीरित्या राबविले आहेत.

या उपक्रमात फाउंडेशनच्या वतीने अशोक गाढे, संदीप नवसुपे, अभिजित डेरे, मनोज सोनवणे, भरत सुंबे, योगेश सोनवणे, भूषण खैरनार यांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर दावभट यांनी केले, प्रास्ताविक ओमशिवा बंडरे यांनी केले तर आभार मेहबू तडवी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भिका वसावे,नारसिंग वसावे,रमण्या वसावे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमाद्वारे 'प्रत्येक हातात पुस्तक... प्रत्येक चेहऱ्यावर हास्य!' हा फाउंडेशनचा संकल्प पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

# सातपुड्याच्या विकासाला मिळणार 'गतीशक्ती'ची जोड! नंदुरबार-मोलगी रेल्वे मार्गाचे प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण; दुर्गम भागासाठी ऐतिहासिक पाऊल

### तळोदा, अक्कलकुवा मार्गे रेल्वे संपर्क वाढणार; स्थानिक नागरिकांच्या समस्या निवारणाची नवी आशा

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'गतीशक्ती' प्रकल्पांतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम आदिवासी बहुल सातपुडा परिसराच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे. प्रस्तावित नंदुरबार ते मोलगी रेल्वेमार्गाच्या पूर्व प्राथमिक सर्वेक्षणासाठी गतीशक्ती मंत्रालय आणि रेल्वेच्या उच्चस्तरीय पथकाने पाहणी दौरा नुकताच यशस्वीपणे पूर्ण केला आहे, ज्यामुळे जिल्ह्यात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे.

दळणवळण सुलभ करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेल्या या प्रकल्पासाठी रेल्वे मंत्रालयाकडून विशेष पत्र जारी करण्यात आले आहे. या पत्रानुसार, रेल्वे आणि गतीशक्ती मंत्रालयाच्या पथकाने १९ नोव्हेंबर रोजी संपूर्ण मार्गाची पाहणी केली.

हा प्रस्तावित रेल्वेमार्ग नंदुरबार जिल्ह्याच्या अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणांना जोडणार आहे. या मार्गामुळे दुर्गम भागातील नागरिकांना थेट मुख्य शहरांशी जोडणी मिळेल:

नंदुरबार – धानोरा –तळोदा – अक्कलकुवा – खापर – मोलगी असा हा मार्ग असणार आहे.



यामुळे तळोदा आणि अक्कलकुवा यांसारख्या मोठ्या तालुक्यांना प्रथमच थेट रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळण्याची शक्यता असून, दळणवळणाचा कायापालट होणार आहे.

सर्वेक्षण पथकाने मोलगी येथे भेट देऊन स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी मोलगी ग्रामपंचायतीच्या सरपंच ज्योती प्रदीप तडवी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक गरजा, जागेची उपलब्धता आणि संभाव्य आव्हाने यावर विचारविनिमय करण्यात आला.

सरपंच ज्योती तडवी यांनी या पाहणीबद्दल माहिती देताना सांगितले की, रेल्वे अधिकाऱ्यांच्या पथकाने गावातील अनेक भागांची पाहणी केली असून, प्रकल्पासाठी आवश्यक ती पुढील कारवाई लवकरच करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या पूर्व प्राथमिक पाहणीनंतर प्रकल्पाला अधिक वैज्ञानिक आधार देण्यासाठी पुढील काही दिवसांत मोलगी ते नंदुरबार या संपूर्ण मार्गाचे ड्रोन सर्वेक्षण करण्यात येणार आहे.या पाहणीचा सविस्तर अहवाल आणि पूर्व प्राथमिक अंदाज आता थेट केंद्र शासनाच्या गतीशक्ती मंत्रालयाकडे सादर केला जाईल. केंद्र सरकारच्या मान्यतेनंतर आणि पुढील स्तरावरील चर्चा झाल्यानंतरच प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल.

हा प्रस्तावित रेल्वेमार्ग सातपुड्याच्या विकासाची जीवनरेखा ठरेल, असा विश्वास स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. याचे दूरगामी परिणाम खालीलप्रमाणे अपेक्षित आहेत त्यात शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी राष्ट्रीय बाजारपेठांचे दरवाजे उघडतील, ज्यामुळे स्थानिक शेतमालाला योग्य दर मिळेल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल., हा डोंगराळ आणि निसर्गरम्य रेल्वेमार्ग एक आकर्षक पर्यटन मार्ग म्हणून विकसित होऊ शकतो, ज्यामुळे रोजगार निर्मिती होईल.,शिक्षण आणि आरोग्याच्या उत्कृष्ट सुविधांसाठी विद्यार्थ्यांना आणि रुग्णांना मोठ्या शहरांपर्यंत जलद आणि सुरक्षित प्रवास करणे शक्य होईल.,दुर्गम भागातील प्रशासकीय संपर्क सुलभ होऊन विकासाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करता येईल.

हा ऐतिहासिक प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण व्हावा, यासाठी जिल्हावासीय केंद्र सरकारच्या पुढील निर्णयाकडे मोठ्या आशेने पाहत आहेत.

# समाजसेवक भिमाशंकर मामा कापसे यांचे सेवा कार्य लोहा–रिसनगाव,आष्टुर रस्त्यावर वाहतूक सहजतेचा दिपस्तंभ

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा ते आष्टुर मार्गावरील रस्ता, ज्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेली झाडे आणि काटेरी झुडपे हे वाहनचालकांसाठी मोठी अडचण बनली होती, त्यावर स्थानिक समाजसेवक भिमाशंकर मामा कापसे* यांनी स्वखर्चाने हातभार लावला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे केवळ वाहतूक मोकळी झाली नाही, पण प्रवासी, एस.टी. चालक व कंडक्टर यांनीही त्यांचे मनापासून आभार मानले आहेत. झुडूपे आणि वाढलेले बाभळीचे झाडे या रस्त्यावर एक प्रकारचा काटेरी कमान तयार करत होते, ज्यामुळे मोठ्या वाहनांना, विशेषतः एस.टी. बसेसना ये–जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या कारणाने वाहतूक मंद पडत होती, प्रवास वेळ वाढत होता आणि समोरच्या लोकांसाठीही असुरक्षितता निर्माण होत होती. आष्टुर ग्रामपंचायत तर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाला आणि इतर लोकप्रतिनिधींना अनेक वेळा निवेदन पाठवले गेले, परंतु दखल न घेतल्याने समस्या दीर्घकाळ कायम होती.*

भिमाशंकर मामा कापसे यांचा पुढाकार भिमाशंकर मामा कापसे यांनी हे सर्व झुडुपे स्वखर्चाने काढण्याचे काम केले. या कामात:

दोन्ही बाजूंची झाडे व झुडपे व्यवस्थित जे.सि.बी.ने साफ करण्यात आली,

काटेरी बाभळीचे झाडे कापण्यात आले, ज्यामुळे कमान स्वरूपाचे रस्ता अडथळे कमी झाले,

यामुळे वाहतूक प्रवाह अधिक सुरळीत झाला आणि प्रवासी सुरक्षिततेचा अनुभव घेत आहेत.

या कृतीमुळे एस.टी. महामंडळाने त्यांचे आभार मानले.आणि चालक व कंडक्टरांनीही त्यांचे कौतुक



केले गेले. हे नैतिक आणि समाजहिताचे कार्य एक खऱ्या स्वहस्ते लोकसेवकाचे उदाहरण आहे.

**ग्रामस्थांचा प्रतिसाद***

स्थानिक शेतकरी, वाहतूक करणारे लोक आणि नागरिक हे मामा कापसे यांच्या या उपक्रमाबद्दल अत्यंत कृतज्ञ आहेत.

अनेकांना वाटते की अशा प्रकारचे लोकप्रतिनिधी जास्त असायला हवेत – जे आपल्या समाजासाठी काही मागण्या न करता, स्वतःच पुढाकार घेतात. हे कार्य केवळ वाहतूक अडचणी दूर करण्याचे नाही, तर समाजाच्या एकात्मतेचे आणि सेवा भावनेचे प्रतीक बनले आहे.

भिमाशंकर मामा कापसे* यांचे मनापासून आभार मानले जातात .

आम्हाला अशा प्रेरणादायी लोकसेवकाची गरज अधिक आहे – जे स्वतःचे वेगळे वारसा नसतानाही समाजासाठी मोठे योगदान देतात.

हे काम करण्यासाठी त्यांनी जी स्वतःची जबाबदारी स्वीकारली, त्यासाठी आम्ही त्यांना सामाजिक व राजकीय यशासाठी गावपातळीवरील व सर्कल मधील आणि जाणारे येणारे लोक शुभेच्छाचा वर्षाव करत आहेत.

# नंदुरबार सायबर सेलने नागरिकांची फसवणूक करणाऱ्या ४ सिमकार्ड विक्रेत्यांना ठोकल्या बेड्या; ४७२ बनावट सिमकार्ड क्टिव्हेट केल्याचे उघड; उल्हासनगरमधील संशयितही ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नागरिकांच्या ओळखपत्रांचा गैरवापर करून बनावट सिमकार्ड क्टिव्हेट करून सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीवर नंदुरबार पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. नंदुरबार सायबर सेल आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने जिल्ह्यातील ४ सिमकार्ड विक्रेत्यांना ताब्यात घेतले असून, त्यांनी एकुण ४७२ सिमकार्ड नागरिकांच्या नावे क्टिव्हेट केल्याचे उघड झाले आहे.

डिपार्टमेंट ऑफ टेलिकम्युनिकेशन कडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी विक्री केलेल्या वोडाफोन, आयडिया, एअरटेल आणि इतर कंपन्यांच्या सिमकार्डचा उपयोग विदेशातून केला जात होता. फसवणूक करणारे कॉलर पोलीस अधिकारी असल्याचे भासवून लोकांना कायदेशीर कारवाईची धमकी देत त्यांची फसवणूक करत होते. या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच, नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी तातडीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा व सायबर सेलचे संयुक्त पथक तयार करण्यात आले.

पथकाने तातडीने कारवाई करत १) अनिल गुरुनामल दहेडा (वय ४०, रा. सिंधी कॉलनी, नंदुरबार) सह इतर तिन्ही आरोपी – २) निकेश जयसिंग वळवी, ३) हितेश जगन वळवी, आणि ४) रोहित गणेश नाईक (सर्व रा. नटावद, ता. जि. नंदुरबार) यांना ताब्यात घेतले. अनिल दहेडा याच्या सांगण्यावरून या तिघांनी नागरिकांच्या ओळखपत्रांचा वापर करून ४७२ सिमकार्ड क्टिव्हेट केल्याची कबुली दिली.

केवळ सिमकार्डच नव्हे, तर या आरोपींनी वेगवेगळ्या लोकांचे बँक खाते उघडून त्यांचे पासबुक/एटीएम कार्ड कागदपत्रांसह उल्हासनगर, जि. ठाणे येथील एका संशयितास पाठवले होते. गुन्ह्याच्या तपासात सायबर सेलने उल्हासनगर येथील या संशयित इसमास देखील ताब्यात घेतले असून, त्याची चौकशी सुरू आहे. उपनगर पोलीस ठाणे येथे माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी जिल्ह्याच्या नागरिकांना आवाहन केले आहे की, बनावट कागदपत्रांच्या आधारे सिम कार्ड आणि बँक फ्रॉडचे प्रकार वाढत असल्याने नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे. कुठल्याही प्रकारची सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर सेलशी संपर्क साधावा.**

# नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई मोलगी हद्दीतील जबरी चोरीचे ०३ आरोपी जेरबंद

## १ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत; फायनान्स कंपनी मॅनेजरवरील दरोडा उघड

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने एक मोठी कारवाई करत मोलगी पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना अवघ्या काही दिवसांत अटक केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेली रोख रक्कम, टॅब आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १,७५,१००/- (एक लाख पंच्याहत्तर हजार एकशे रुपयांचा) मुद्देमाल हस्तगत केला आहे.



दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी, आकाश सुरेश जलोतकर (वय- २६), जे एका फायनान्स कंपनीचे केंद्र मॅनेजर आहेत, ते त्यांच्या कंपनीचे कर्ज वसुलीचे रोख रक्कम घेऊन जमाना येथून अक्कलकुवा येथे मोटारसायकलने जात होते. उर्मिलामाळ गावाजवळ चढाव वळण रस्त्यावर तीन अज्ञात इसमांनी त्यांना अडवून त्यांच्याकडील काळ्या रंगाची बॅग जबरदस्तीने हिसकावून नेली. या बॅगेत रोख रक्कम आणि टॅब होता. या घटनेनंतर मोलगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा पोलीस दलाने या गंभीर गुन्ह्याचा तपास तातडीने स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवला. पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा नितीन वळवी आणि त्याच्या साथीदारांनी केला आहे.

या माहितीनुसार, तातडीने पथकाने तळोदा येथील चिनोदा येथे जाऊन मुख्य आरोपी नितीन वेस्ता वळवी (रा. सल्लीबार, ता. अक्कलकुवा) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान नितीन वळवीने गुन्ह्याची कबुली दिली आणि इतर दोन साथीदारांची नावे उघड केली.
स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लागलीच इतर दोन आरोपींनाही ताब्यात घेतले:
१. कृष्णा विक्रमसिंग पाडवी (रा. वाण्याविहीर, ता. अक्कलकुवा)
२. संदीप किरता वळवी (रा. पिपरखंड पाडा, ता. अक्कलकुवा).
पोलिसांनी तिन्ही आरोपींकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल हस्तगत केला:
रोख रक्कम: ८५,१००/-रुपये टॅब (किंमत): १०,०००/-रुपये गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल: ८०,०००/-रुपये एकुण हस्तगत मुद्देमाल: १,७५,१००/-रुपये. सदर गुन्ह्याचा पुढील अधिक तपास पोलीस सब इंस्पेक्टर सागर गाडीलोहार हे करीत आहेत. या यशस्वी कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे अभिनंदन केले आहे.

# नंदुरबारमधील ५०६ वनदाव्यांवरील सुनावणी संपन्न जिल्हाधिकाऱ्यांकडून न्याय्य व तातडीने निर्णयाचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी आणि पारंपरिक वननिवासींच्या प्रलंबित हक्कांना न्याय देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ रोजी अक्कलकुवा येथील तहसील कार्यालयात जिल्हास्तरीय वनहक्क समितीची सुनावणी उत्स्फूर्तपणे पार पडली.



या सुनावणीत एकाच वेळी एकूण ५०६ वनदावे विचारार्थ घेण्यात आले. या दाव्यांवर तात्काळ आणि पारदर्शकपणे निर्णय घेण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना कडक निर्देश दिले आहेत. डॉ. सेठी यांनी बैठकीत स्पष्ट केले की, वनहक्क कायद्याचा मुख्य उद्देश म्हणजे आदिवासी व पारंपरिक वननिवासींना त्यांच्या वास्तव हक्कांचे कायदेशीर संरक्षण देणे आहे. पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळणे हीच आमची प्राथमिकता आहे.दावे निकाली काढताना कोणत्याही प्रकारची शिथिलता न ठेवता आवश्यक पुरावे, नकाशे आणि अहवालांची सखोल पाहणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यामुळे, गरजू आणि पात्र कुटुंबांना त्यांच्या हक्काचे वनपट्टे जलदगतीने मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. या बैठकीस जिल्हास्तरीय वनहक्क समितीचे सदस्य सचिव तथा प्रकल्प अधिकारी मा. चंद्रकांत पावर, उपवनसंरक्षक तळोदा सुहास चव्हाण यांच्यासह जिल्हा व्यवस्थापक प्रकाश गावित, विक्रम गायकवाड, माकत्या वसावे आणि तालुका व्यवस्थापक दिपक पाडवी हे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

उपस्थित सर्व अधिकाऱ्यांनी दावे जलद आणि न्याय्यरीत्या निकाली काढून वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचा सामूहिक निर्धार व्यक्त केला. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः जातीने लक्ष दिल्याने वनदाव्यांचा निपटारा लवकर होण्याची चिन्हे आहेत.

# बिबट्याच्या भीतीत शेतकरी दिवसा पूर्णवेळ वीज पुरवठ्याची राष्ट्रवादी काँग्रेसची महावितरणाकडे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गावांमध्ये व शेती परिसरात बिबट्या तसेच इतर हिंसक प्राण्यांचा वाढता वावर पाहता शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या भीतीमुळे शेतकरी रात्री शेतीकामासाठी जाण्यास असमर्थ आहेत. याच पार्श्वभूमीवर शासन आणि महावितरणाने शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा देण्याची योजना लागू केली असली, तरी प्रत्यक्षात दिवसाच्या वेळेत केवळ तीन तासच वीज उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.



दिवसा मिळणारा अल्प वीजपुरवठ्यामुळे सिंचनाचे काम अर्धवट राहते, पिकांची वाढ बाधित होते आणि सुरक्षेचा धोका अधिक गंभीर बनतो. त्यामुळे शेतकऱ्यांना मंजूर केलेला दिवसा आठ ते दहा तासांचा पूर्णवेळ वीजपुरवठा तात्काळ सुरू करावा, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केली आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा विचार करून रात्रीचा वीजपुरवठा पूर्णपणे बंद ठेवावा आणि दिवसा स्थिर, अखंड वीज उपलब्ध करावी, असा आग्रहही पक्षाने व्यक्त केला आहे. यासोबतच वीज पुरवठ्यातील अनियमितता, लोडशेडिंग, कमी व्होल्टेज यांसारख्या समस्यांवर तातडीने उपाययोजना कराव्यात तसेच शेतकऱ्यांना अचूक वीज वेळापत्रकाची माहिती उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.या सर्व मागण्यांसाठी विद्युत महावितरणाचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे, तालुका अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस तालुका अध्यक्ष अरुण म्हस्के, भरत बोरवे, चंद्रकांत पवार, गणेश तोडमल, महेश शेळके, युवराज हजारे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आणि शेतीच्या हितासाठी दिवसा स्थिर वीजपुरवठा हा काळाची गरज असल्याचे पक्षाने स्पष्ट केले.

### युवा श्रमिकांच्या हक्कां साठी भारतीय जनता मजदुर संघाचा मोठा पुढाकार

# शांत प्रकाशजी जाटव,रौशन कुमारजी,चरणसिंहजी यांचे नेतृत्व सक्षम-भाऊसाहेब घोडके

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

देशभरातील युवा श्रमिकां साठी समान वेतन, वेळेवर पगार,सुरक्षित कार्यस्थळ,सामाजिक सुरक्षा आणि नोकरीच्या सुरुवातीला अनिवार्य नियुक्तीपत्र (Appointment Letter) मिळावे,यासाठी भारतीय जनता मजदूर संघाने मोठी मोहीम सुरू केली आहे.राष्ट्रीय अध्यक्ष शांतप्रकाशजी जाटव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सचिव रौशन कुमारजी,राष्ट्रीय महासचिव चरण सिंहजी यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाला गती मिळत आहे.दिल्लीतुन झालेल्या ऑनलाईन महत्त्वपूर्ण चर्चासत्रात युवा श्रमिकांच्या हक्कांवर, रोजगारातील पारदर्शकते वर आणि भविष्याच्या सुरक्षेवर व्यापक चर्चा झाली.यावेळी युवा मोर्चा, मंडल दिल्ली प्रदेशचे उपाध्यक्ष तसेच बीजेएमएस सोशल मीडिया आणि डिजिटल क्रिएटर्स बोर्डचे राष्ट्रीय सचिव रौशन कुमारजी यांनी युवा श्रमिकांच्या समस्यांवर प्रकाश टाकत संघटनेच्या उपक्रमांची माहिती दिली.या प्रसंगी भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी युवा संघटनांना मार्गदर्शन केले.महाराष्ट्रासह विविध राज्यांत युवकांना संघटित करून त्यांना सक्षम करण्याचे कार्य ते सातत्याने करीत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.तसेच महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी,मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील हे ही युवकांना संघटित करण्याचे कार्य सक्रियपणे करीत असल्याचा उल्लेख करण्यात



आला.बैठकीत भोपालसह अनेक भागांत युवा वर्गासाठी कौशल्य विकास,डिजिटल प्रशिक्षण आणि रोजगार निर्मितीच्या नव्या संधी बाबतही सविस्तर चर्चा झाली.केंद्रातील मोदी सरकारने आधीच 'स्किल इंडिया','स्टार्ट-अपइंडिया', 'मेक इन इंडिया', 'ई-श्रम कार्ड योजना' आणि विविध सामाजिक सुरक्षा योजनांच्या माध्यमातून युवा व श्रमिकांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.त्याच धर्तीवर बीजेएमएसच्या वतीने ही श्रमिकांचे हक्क,सन्मान आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न अधिक तीव्र करण्यात येत आहेत.युवकांच्या भूमिकेवर बोलताना रौशन कुमार म्हणाले की,
युवा सुरक्षित व सशक्त असेल,तेव्हाच देशाचे भविष्य भक्कम होईल. प्रत्येक श्रमिकाला त्याचा हक्क,सन्मान आणि सुरक्षा मिळाली पाहिजे.
या संपूर्ण चर्चेच्या माध्यमा तून युवा श्रमिकांसाठी नव्या आशा,नव्या संधी आणि सकारात्मक बदलांच्या युगाची सुरूवात होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# गोंदवले दिंडीचे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने उत्साहात स्वागत

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री.ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज सेवाभावी मंडळातर्फे सालाबादप्रमाणे यंदाही नगर-गोंदवले दिंडीचे भव्य आयोजन करण्यात आले. दिंडीचे प्रस्थान रविवारी सकाळी भक्तीमय वातावरणात झाले. पहाटे श्रींच्या पादुकांवर अभिषेक केल्यानंतर त्या पालखीत स्थापित करण्यात आल्या. पादुकांची पूजा माजी नगरसेवक निखिल वारे यांच्या हस्ते संपन्न झाली.



शिलाविहार येथुन प्रस्थान झाल्यानंतर वारकर्यांच्या सेवेसाठी विविध समाजसेवेच्या पुढाकारांचा समावेश होता. कोठला चौकात खांडरे परिवाराच्या वतीने सर्व वारकर्यांना चहा-बिस्कीटे वाटप करण्यात आले. पुढे कायनेटिक चौकात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या वतीने दिंडीचे स्वागत करण्यात आले. वृत्तपत्र विक्रेत्यांनी वारकर्यांचे सत्कारपूर्वक स्वागत करून त्यांना आर्थिक योगदान देत सहकार्य केले.या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीची जाणीव पुन्हा दृढ झाली.

या प्रसंगी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष संजय गोरे, प्रमोद पंतम,शरद बेरड, सुभाष काकडे, प्रमोद पाठक, राहुल लिमये प्रसिद्ध प्रमुख विजय मते आदी पदाधिकारी व विक्रेते उपस्थित होते. तसेच सुभाष लुणीया परिवाराच्या वतीने सर्व वारकर्यांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले. दिंडी चालक सौ.रेखाताई रिंगणे यांनी सांगितले की, यंदा दिंडीला २५ वर्ष पूर्ण होत असून दरवर्षी नगर शहर व उपनगरातील वृत्तपत्र विक्रेते मोठ्या मनाने दिंडीसाठी योगदान देतात. त्यांच्या सहकार्यामुळे दिंडीची सेवा अधिक भक्कम होते.दिंडीचे प्रस्थान झाल्यावर माजी नगरसेवक निखिल वारे यांनी दिंडीसोबत पायी चालत सर्व वारकर्यांना निरोप दिला. वारकरी, विक्रेते व नागरिकांच्या उपस्थितीमुळे दिंडीचा मार्ग भक्तिमय निनादांनी व अभंगगायनाने भरून गेला.श्रद्धा, सेवा आणि समर्पणाने सजलेली ही दिंडी पुढील मार्गाला रवाना झाली.

# बीड जिल्ह्यात बांधकाम कामगारांसाठी आरपीएल कौशल्य वृद्धीकरण प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## कामगार अधिकारी सुधाकर कोणाले साहेब यांच्या अधिपत्याखाली या योजनेची आखणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून नोंदणीकृत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी राबवण्यात येणाऱ्या कौशल्य वृद्धीकरण (RPL - Recognition of Prior Learning) प्रशिक्षण योजनेला बीड जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमाअंतर्गत बांधकाम क्षेत्रातील कामगारांना त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित विविध बांधकाम ट्रेड्सचे दर्जात्मक प्रशिक्षण दिले जात असून, रोजगारक्षमतेत वाढ करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

प्रशिक्षण संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या या प्रशिक्षणामुळे कामगारांना आपले कौशल्य अधिक प्रभावीपणे सिद्ध करण्याची संधी उपलब्ध होत आहे. यामुळे उच्च दर्जाचे, कुशल आणि कार्यक्षम बांधकाम कामगार तयार होण्यास मदत होत आहे. प्रशिक्षणाचा निर्धारित कालावधी पूर्ण केल्यानंतर अंतिम मूल्यांकन केले जाते. मूल्यांकनात यशस्वी झालेल्या कामगारांना महाराष्ट्र बांधकाम कामगार मंडळामार्फत अधिकृत प्रमाणपत्र दिले जाणार आहे.प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर व प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मंडळाकडून संबंधित बांधकाम कामगारांना सदर योजनेनुसार ४२०० रुपयांचा विशेष भत्ता देखील देण्यात येणार आहे. हा भत्ता 'स्टाय फंड' स्वरूपात कामगारांच्या कौशल्यवृद्धीस प्रोत्साहन देणारा ठरणार आहे. कामगारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध योजना राबविण्याचा प्रयत्न महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ सातत्याने करत असते. त्याच अनुषंगाने एमबीओसीडब्ल्यू (MBOCW) अंतर्गत ठझङ प्रशिक्षण ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबवली जात आहे. प्रशिक्षण प्रक्रियेदरम्यान कामगारांना व्यावहारिक मार्गदर्शन, क्षेत्रातील तज्ज्ञांचे सहकार्य आणि प्रत्यक्ष कामाचे प्रात्यक्षिक दिले जाते.

बीड जिल्ह्यातही या योजनेची अंमलबजावणी वेगाने सुरू असून कामगार अधिकारी कोणाले साहेब या जातीने लक्ष घालून या योजनेची इंडस कंपनी मार्फत एक चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी करून घेऊन कामगारांना कशा पद्धतीने या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी चांगल्या पद्धतीचा याचा अतिशय चांगला प्रयत्न या ठिकाणी कामगार अधिकारी करत आहेत आणि ही योजना खरोखरच या ठिकाणी यशस्वी करण्याचा प्रयत्न कामगार अधिकारी कोणाले साहेब या ठिकाणी करत आहेत.

कामगार अधिकारी कोणाले साहेब यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे जिल्ह्यातील ४०३१ बांधकाम कामगारांची प्राथमिक एनरोलमेंट पूर्ण झाली आहे. आगामी टप्प्यात या योजनेचा एकूण ५२७० कामगारांना लाभ मिळणार असल्याची माहिती संबंधित विभागातून देण्यात आली. प्रशिक्षणानंतर सर्व पात्र कामगारांना ४२०० रुपयांचा लाभांश व अधिकृत प्रमाणपत्र वितरीत केले जाणार आहे.

बांधकाम कामगारांसाठी ही योजना रोजगार संधी, कौशल्य वृद्धी, आणि आर्थिक मदत या तिन्ही आघाडयांवर उपयोगी ठरत असल्यामुळे जिल्ह्यात आनंदाची लाट उसळली आहे. या उपक्रमामुळे बांधकाम क्षेत्रात अधिक प्रशिक्षित, गुणवत्ता मानक पाळणारा कार्यबल निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

वरील सर्व योजनेची इंडस कंपनीच्या अधिकारी व व्यवस्थापन टीम तत्परता आणि योग्य टीमच्या प्रयत्नातून बीड जिल्ह्यात ही योजना नक्कीच चांगल्या प्रकारे राबवण्याचा त्यांचा मानस व प्रयत्न या ठिकाणी दिसत आहे त्या अनुषंगाने जास्तीत जास्त कामगारांना लाभ मिळवण्यासाठी जनजागृती करून या योजनेविषयी आकर्षण करून त्यांना लाभ देण्याचा प्रयत्न करीत आहे

# विद्यार्थी केंद्रबिंदू मानून सामाजिक जाणीव ठेवून मदत करणारे प्रोफेसर डॉ.दिवाण यांचा सत्कार संपन्न

## दान पारमितेचे पालन करून धम्मदीप बुद्ध विहारा करिता धम्मदान

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

भीम जयंती असो, सामाजिक, शैक्षणिक, संस्कृतिक व विध्यार्थी हिताच्या कार्यक्रमात तसेच महामानव अभिवादन ग्रुप बीड व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाला मौलिक मार्गदर्शन व सहाय्य करणारे प्रा. डॉ शिवाजीराव दिवाण यांना प्रोफेसर पदी पदोन्नती मिळाल्या बद्दल धम्मदीप बुद्ध विहार (बलभीम नगर ) शिवाजीनगर बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप, वाचाल तर वाचाल वाचनालय व धम्मदीप बुद्धविहार कमिटी तर्फे मा. से. नी. सी ई ओ पी. व्ही. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रो. डॉ. उपप्राचार्य उत्तमराव साळवे यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ व त्रिसरण पंचशील हाच जीवनमार्ग देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. जी. वानखेडे यांनी केले तर सूत्रसंचालन ड तेजस वडमारे यांनी केले. विचारमंच्यावर अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जी एम भोले, कॅप्टन राजाभाऊ आठवले, ड हनुमंत कांबळे,प्रशांत वासनिक, डी



एम राऊत यांची उपस्थिती होती. सर्व प्रथम तथागतांच्या प्रतिमेस पुष्प,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून त्रिवार अभिवादन करण्यात आले. त्रिसरण पंचशील ग्रहण केल्या नंतर सत्कार मुर्ती डॉ दिवाण च्या सुविद्य पत्नी सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका आयु माया दिवाण -सोनवणे आपल्या मनोगतात जीवनसाथी बद्दल भावुक होऊन बोलतांना म्हणाल्या की, जीवन साथी बद्दल बोलतांना एकाच वाक्यात बोलेल की डॉ. दिवाण सर एक भला माणूस आहे.ह्या त्यांच्या एका वाक्यातच सरांची विध्यार्थ्यां बद्दल मदतीची तळमळ त्यांनी शिक्षण काळ भोगले कष्ट व खेड्यातून येऊन उच्चशिक्षणासाठी घेतलेले परिश्रम आणि त्यातून मिळविलेल्या ज्ञानाचा व आर्थिक सुबत्तेचा उपयोग डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्या प्रमाणे उत्पन्नाचा २०वा भाग समाजाच्या उद्धाराकरिता दान रूपात केला पाहिजे हे लक्षात ठेऊन पदोन्नती झाल्यामुळे( इन्क्रिमेंट )पगार वाढीचा पहिला लाभ तथागतांनी सांगितलेल्या दान पारमितेचे पालन करून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल वाचनालय करीत असलेल्या सामाजिक कार्याकरिता तसेच बीड शहराच्या मध्यभागी असलेल्या धम्मदीप बुद्ध विहाराच्या अपुऱ्या राहिलेल्या पुढील बांधकामा करिता दान करण्याचे जाहीर केले. धम्मदीप बुद्धविहारा करिता आयु माया दिवाण यांनी लिहिलेले, रमाई जीवनचरित्र १५ पुस्तकांची उपस्थित महिला व उपासकांना भेट दिली. प्रा. डॉ. साळवे सरांनी नविन शैक्षणिक धोरणातून होणारे बदल अनेक उदाहारनाद्वारे समजावून सांगितले. माता रमाई ने डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट व डॉ. बाबासाहेबानी उच्च शिक्षणासाठी परदेशात केलेला १८-१८ तास अभ्यास व त्यातून त्यांनी प्राप्त केलेल्या विद्येला शील व करुणेची साथ देऊन समाजाच्या हिता करिता,भारताच्या हिता करिता केलेले कार्य समजावून सांगितले. अध्यक्षीय समारोपात पी. व्ही. बनसोडे म्हणाले की शिक्षणामुळे पुढे गेलेल्यांनी बुद्धिजीवी, नौकरदारांनी सामाजिक जाण ठेऊन समाजाची सेवा करावी, त्या करिता सर्वांनी एकत्र येऊन ठोस कृती कार्यक्रम ठरवून तो पूर्णपणे कसा राबवीता येईल या बद्दल मार्गदर्शन केले. सत्काराला उत्तर देताना प्रो. डॉ.दिवाण सरांनी समाजोपयोगी कार्यात नेहमीच तन-मन -धनाने सहभाग नोंदवण्याचे ठोस आश्वासन दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अंजली तेजस वडमारे यांनी केले. या कार्यक्रमास परिसरातील अंजली विशाल वडमारे, सरिता खेमाडे,अशा धनवे, कोमल वाघमारे,अर्चना जाधव, आशाबाई भालेराव, सविता डोळस, हौसाबाई वाघमारे, विशाल वडमारे, प्रकाश वाघमारे यांची उपस्थिती होती. शेवटी सरणात्तय ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अखेर केज पंचायत समितीला केविसंस ने कुलूप ठोकले!

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज पंचायत समिती च्या प्रांगणात सभापती, अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या चार मजली दोन व इतर दोन अशा चार भव्य इमारती गेली तीन वर्षापासून केवळ वीजफिटिंग व जोडणी अभावी धूळ खात पडल्या आहेत. सध्या शासनाच्या दुर्लक्षामुळे या इमारती गुन्हेगारी व अवैध बाबींच्या अड्डे बनल्या आहेत.या इमारती प्रशासनाने तात्काळ संबंधित गुत्तेदाराकडून वीजपुरवठा काम पूर्ण व पंचायत समितीकडे हस्तांतरित करून अधिकारी व कर्मचारी यांना राहण्यासाठी राहण्यासाठी उपलब्ध करून द्याव्यात या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने मंगळवारी पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वारास कुलूप ठोकले.



केज पंचायत समितीच्या जागेत सभापती, अधिकारी व कर्मचारी यांना राहण्यासाठी प्रचंड खर्च करून गेली तीन वर्षापासून भव्य व सुसज्ज इमारती बांधल्या गेल्या. बांधकाम ही वेळेत पार पडले. मात्र त्यानंतर वीज फिटिंग व जोडणी चे काम वेळेत पूर्ण न होऊ शकल्याने या इमारती गेली तीन वर्षापासून बेवारस अवस्थेत धूळ खात पडल्या आहेत. केवळ वीज फिटिंग काम न झाल्याने या इमारती केज पंचायत समितीकडे हस्तांतरित होऊ शकल्या नाहीत. मध्यंतरीच्या काळात या इमारतीकडे कोणाचेही लक्ष न राहिल्याने अज्ञात, टुकार व गुन्हेगारी टोळक्यांनी या इमारतीचा आश्रय घेवून सिगारेट, दारू पिणे, जुगार यासह इतर अवैध धंद्यासाठी या इमारतींचा वापर सुरू केला. या सर्व इमारतींच्या खिडक्यांचा काचा व कांहीं दरवाजेही तोडफोड करण्यात आली. गेली तीन वर्षात या इमारतींचे प्रचंड नुकसान करण्यात आले आहे. शासकीय संपतीकडे अधिकारी व कर्मचारी किती बेफिकीर वृत्तीने वागतात हे यावरून सिद्ध झाले आहे. स्वतःच्या पैशातून उभा केलेल्या इमारतीकडे असे कोणी पाहिले असते का? एवढी वर्षे जबाबदार अधिकाऱ्यांनी वरिष्ठ पातळीवर माहिती पाठवून पाठपुरावा केला असता तर हे काम खूप लवकर पूर्ण होऊन जनतेच्या पैशाचा हा अपव्यय व नुकसान टाळता आले असते.

केज विकास संघर्ष समिती गेली तीन वर्षे यासाठी पाठपुरावा करून या इमारती तात्काळ राहण्यासाठी उपलब्ध करून देण्याची वेगवेगळ्या निवेदने व आंदोलनाद्वारे करत आहे.

याही वेळी समितीने प्रशासनाकडे रीतसर निवेदन देऊन मागणी केली होती. मात्र प्रशासनाने जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याने समितीने मंगळवारी केज पंचायत समितीच्या मुख्य प्रवेश द्वाराला कुलूप ठोकले. अखेर केज पंचायत समिती प्रशासनाने येत्या ३१ डिसेंबर पूर्वी या इमारतीचे प्रलंबित काम पूर्ण करून राहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील असे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनात समितीचे समन्वयक व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, शेतकरी संघटनेचे कुलदीप करपे सहभागी होते. निवेदनावर हनुमंत भोसले , नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, महेश जाजू , यांच्या स्वाक्षरी आहेत.

# विजय साळवे यांच्या प्रचार रॅलीस प्रभागातील जनते कडून जबरदस्त प्रतिसाद

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

माजलगाव शहरातील प्रभाग क्रमांक १-ब येथून नगरपालिका निवडणूक लढविणाऱ्या शिवसेना-रिपब्लिकन सेना युतीचे अधिकृत उमेदवार विजय साळवे यांच्या भव्य प्रचार रॅलीचा उत्साहात शुभारंभ झाला. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सतत सक्रिय राहून जनतेच्या प्रश्नांसाठी मोर्चे, आंदोलने व उपोषण आदी माध्यमातून लढा देणारे साळवे हे 'धनुष्यबाण' चिन्हावरून निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत.

प्रभागातील बहुजन समाजाच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या विजय साळवे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत नागरिकांनी रॅलीदरम्यान मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली. मतदारांनी धनुष्यबाण चिन्हावर मतदान करून विकासाला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला.

उच्च प्रतिष्ठा लाभलेल्या प्रभाग क्रमांक १ -ब मध्ये विजय साळवे यांच्या प्रचार रॅलीत उत्साहाचा प्रचंड उधाण पाहायला मिळाले. रॅलीत शिवसेना



शिंदे गटाचे तालुकाप्रमुख तुकाराम बापू येवले, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व माजी नगरसेवक नितीन मुंदडा, प्रभाग क्रमांक १ -अ चे शिवसेना-धनुष्यबाण उमेदवार राजू चव्हाण, तसेच वशिष्ठ लांडगे, विश्वनाथ तोडके, ओमप्रकाश टाकणखार विलास जावळे अन्वर सय्यद गायसमुद्रे सुरेश साळवे भास्कर पौळ धम्मा गावडे बाळु साळवे सय्यद नाजेर विशाल साळवे शेख अर्शद यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उमेदवारांच्या स्वागताचा जोश आणि प्रभागातील जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता आगामी निवडणुकीत जोरदार चुरस निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाचे विभागीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**


दि.२३ नोव्हेंबर २०२५ रोजी युवक व क्रीडा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा १७ वर्ष वयोगट संपन्न झाल्या.यात साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने छत्रपती संभाजी नगर ग्रामीण,छत्रपती संभाजी शहर,परभणी ग्रामीण,परभणी शहर या संघाना पराभूत करून स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.सदर मुलींचा संघ दि.२६ नोव्हेंबर २०२५ पासून नागपूर येथे होणाऱ्या राज्य स्तरीय स्पर्धेत छत्रपती संभाजी नगरचे नेतृत्व करणार आहे.याविद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक श्री.रामदास सानप सर,सहाय्यक दीपक साखरे सर,श्रीमती कांदे मॅडम,चि.केशव कराड,चि.कृष्णा गित्ते यांचे मार्गदर्शन लाभले होते.याबद्दल बीड जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर,मार्गदर्शक रेवन्नाथ शेलार सर, अनिकेत काळे सर,सतीश राठोडसर संस्था अध्यक्ष ड.उद्धवराव कराड,

प्राचार्य व मार्गदर्शिका गित्ते मॅडम,कापसे सर, सर्व शिक्षक कर्मचारी यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अतिक्रमण हटविण्याच्या कारवाई करण्यास गेलेल्या पोलिसांवर महिलांचा हल्ला : चौघी विरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

सशुल्क पोलिस संरक्षण घेऊन शेतातील अतिक्रमण हटवून ताबा देण्याची कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिस पथकातील महिला पोलिसांवर चार महिलांनी हल्ला केला आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील टाकळी रोड लगत असलेल्या सर्व्हे नंबर ३७१ मधील वसीम साबेर कुरेशी यांच्या मालकी हक्कातील जमीनी वरील अतिक्रमण हटवून त्याचा ताबा देण्या संदर्भात वसीम कुरेशी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांना सशुल्क पोलीस बंदोबस्ताची मागणी केली होती. त्या नुसार दि. २१ नोव्हेंबर रोजी सिंधूबाई कदम यांना त्यांनी केलेले अतिक्रमण काढून घेण्या संदर्भात नोटीस बजावली होती. दि. २४ नोव्हेंबर रोजी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशाने पोलिस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक



प्रल्हाद चव्हाण, पोलिस हवालदार फुलचंद सानप, महिला पोलिस पूजा माके, महिला पोलीस भाग्यश्री भालेराव यांचेसह मंडळ अधिकारी दयानंद मस्के, मंडळ अधिकारी नितीन भालेराव यांच्यासह गेले होते. यावेळी वसीम कुरेशी यांच्या मालकी हक्कातील सर्व्हे नंबर ३७१ मधील ७ गुंठे मध्ये सिंधू कदम यांनी केलेले अतिक्रमण हटविण्या संदर्भात पथक कारवाई करीत असताना त्यांना सदरचे अतिक्रमण तुम्ही आता पर्यत का हाटविले नाही? असे विचारले असता सिंधू कदम यांनी आरडा ओरड करण्यास सुरुवात केली. त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिची मुलगी मिराबाई लक्ष्मण देटे व नातेवाईक भाग्यश्री रामेश्वर गायकवाड, रुक्मीनी गोपाळ फावडे हे आले. त्यांनी आल्या नंतर त्या सर्वांनी कर्तव्यावरील महिला पोलीस अंमलदार यांच्या अंगाशी झोंबाझोंबी करू लागले. तसेच आरडा ओरड करून गोंधळ सुरू केला. त्यांना समजावण्याचा प्रयत्न करीत असतांना सिंधुबाई कदम ही महिला पोलीस अंमलदार यांचे अंगावर दगड घेवुन धावुन गेली. इतरांनी आरडाओरड करून तुम्हाला आम्ही बघुन घेतो. तुमच्या नोकऱ्या घालवतो. असे म्हणुन शासकिय काम करीत असतांना बाळाचा प्रयोग करून सरकारी कामात अडथळा केला आहे.या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सुकुमार उर्फ राकेश बनसोडे यांनी दि. २४ नोव्हेंबर रोजी रात्री १०:०० सुमारे दिलेल्या तक्रारी वरून सिंधुबाई रतन कदम, मिराबाई लक्ष्मण देटे, भाग्यश्री रामेश्वर गायकवाड (रा. कदमवाडी ता. केज) रुक्मीनी गोपाळ फावडे (रा. वैष्णवी देवी मंदीर समोर बीड) यांनी संगनमत करून आम्ही लोकसेवक म्हणुन आपले कर्तव्ये कायदेशीरपणे पार पाडत असताना बल प्रयोग करून शासकिय कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी गु. र. नं, ६५४/२०२५ भा. न्या. सं. १३२, २२१, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संगीता हणवते या तपास करीत आहेत.

# मंजरथ-माजलगाव बससेवा नियमित करण्याबाबत रिपब्लिकन सेनेचे निवेदन

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

मंजरथ ते माजलगाव दरम्यानची बस वाहतूक अनियमित असल्याने नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची दखल घेत रिपब्लिकन सेनेच्या वतीने माजलगाव आगार व्यवस्थापकांना औपचारिक निवेदन सादर करण्यात आले. निवेदन स्वीकृत करताना आगारप्रमुख कोळेकर साहेब यांनी प्रतिनिधीमंडळाशी सविस्तर चर्चा केली. सद्यस्थितीत या मार्गावर केवळ एक फेरी सुरू असून, पुढील दोन दिवसांत पाच नियमित फेऱ्या सुरू करण्यात येतील अशी लेखी माहिती त्यांनी प्रदान केली. तसेच नव्या वेळापत्रकाची घोषणा लवकरच करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवेदन सादर करताना उपस्थित रिपब्लिकन सेना तालुका उपाध्यक्ष संतोष खुणे युवा नेते सचिन पाडमुख माजी ग्रा.प. सदस्य संदीपान डोंबाळे काशिनाथ थोरात बाबासाहेब डोंगरे भद्रर्गे मामा इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077